स्थापना
१ मे १९५७

# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे – ४११०३७
www.puneapmc.org / Email : kubspune37@rediffmail.com

जा.क्र.प्रशा/स्थापत्य/गु.भु./अत्या.फु.बा./एचडीडीपिटस/ २८ /२०२६-२७ दिनांक ८ /०४/२०२६

**प्रसिद्धीपत्रक**

**विषयः- कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेच्या मुख्य बाजार आवारात फुलांचा बाजार उभारणे कामाअंतर्गत २२ किलो व्हॅट नविन एच.टी. केबल टाकणेसाठी एच.डी.डी आणि पिटसचे कामांचे दर सादर करणेबाबत...**

अनुभवी व सक्षम ठेकेदारांना कळविणेत येते की, कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेच्या मुख्य बाजार आवारात फुलांचा बाजार उभारणे कामाअंतर्गत **२२ किलो व्हॅट नविन एच.टी. केबल टाकणेसाठी १८० रनिंग मीटर केबल एच.डी.डी. आणि २० पीटस हे काम** करावयाचे आहे. काम करावयाच्या ठिकाणी स्वतः (ठेकेदार) यांनी संस्थेच्या स्थापत्य विभागाच्या संबंधीत अधिकारी / कर्मचारी / प्रकल्प सल्लागार यांचेसोबत जाऊन प्रत्यक्ष कामाची पाहणी करून तद्नंतरच दरांची मोहरबंद दरपत्रके सादर करावीत. सदरचे काम हे तत्सम / संबंधीत प्रकारचे काम करणा-या अनुभवी ठेकेदारांकडून अल्प मुदतीत (३ दिवसात) दरपत्रके मागवून करावयाचे आहे.

तरी सदर कामाची मोहरबंद दरपत्रके दिनांक१० /०४/२०२६ अखेर या कार्यालयात सादर करावीत. सादर झालेली मोहरबंद दरपत्रके शक्य झाल्यास त्याच दिवशी अथवा दिनांक१३ /०४/२०२६ रोजी उपस्थित ठेकेदारांसमोर उघडण्यात येतील. कोणतेही अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेने राखून ठेवला आहे, याची नोंद घ्यावी.

सदरचे प्रसिद्धीपत्रक मुख्य कार्यालयाच्या नोटीसबोर्डवर आणि बाजार समिती पुणेच्या puneapmc.in या संकेतस्थळावर दर्शिवणेत येत आहे.

सचिव
कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे

फोन : +९१ २० २४२६०२०३/२४२६२३४९/२४२७२८८७

Scanned with OKEN Scanner